## ऋण निर्देश

प्रस्तुत शोधप्रबंध ज्यांच्या मदतीशिवाय पूर्ण करणे केवळ अशक्य होते ते कॉलेज ऑफ एज्युकेशन, कोडोलीचे सन १९९०-९१ या सालातील छात्राध्यापकांचे बहुमोल सहकार्य मिळाले. विशेषत: पाटील अरूण, श्री. रणखांबे, श्री. मगदूम, श्री. रोकडे, श्री. जाधव, श्री.माने, श्री. चौगले, श्री. खाडे, श्री. मुल्ला, श्री. बिरादार यानी खूप परिश्रम घेतले त्याबद्दल प्रथम मी त्यांचा ऋणी आहे. तसेच या कॉलेजचे प्राचार्य ढवळे, जी.एम्. यांनी परवानगी दिल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी माझे मार्गदर्शक डॉ. ए.एन.जोशी, प्रपाठक, शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यानी स्वत:च्या स्वास्थ्याची पर्वा न करता वेळोवेळी जे मार्गदर्शन केले व अत्याधुनिक ज्ञानग्रहण करण्याची जी दिशा दिली, त्यामुळेच नवीन विषय असतानासुध्दा हा शोधप्रबंध पूर्ण करण्यात शेवटपर्यन्त उत्साह आणि आनंद वाटला. याबद्दल त्यांचा मी सदैव ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. सोनार तसेच डॉ. देवस्थळी आर.बी. यांनी सदर प्रबंधासाठी लागणाऱ्या व्हिडिओ कॅसेटस् व व्हिडिओ कॅमेरा उपलब्ध करून देऊन रेकॉर्डिन्ग करण्यास परवानगी दिल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार. श्रीमती श्रीधर, डॉ.सौ. येवले व डॉ.सौ. पद्मिनी यानी या कार्यात वेळोवेळी मार्गदर्शन केले. या शिवाय या विभागातील सर्व लिपिक आणि सर्व सेवक या सर्वांनी बहुमोल सहकार्य केले याबद्दल या सर्वांचे मन:पूर्वक आभार. या विभागातील वरिष्ठ लिपिक श्री. कवडे यानी स्वत:चे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य ठीक नसतानासुध्दा सदर प्रबंध सुबक आणि वेळेत टंकलिखित केल्याबद्दल त्यांना धन्यवाद.

श्री. बाळासाहेब माने शिक्षण प्रसारक मंडळ, अंबपचे अध्यक्ष व संस्थापक श्री. अशोकराव माने व कॉलेज ऑफ एज्युकेशन, पेठ वडगावचे प्राचार्य श्री. नाईकनवरे, यु.एस्. व इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. माने व इतर शिक्षक आणि यशवंत हायस्कूल, कोडोलीच्या मुख्याध्यापिका सौ. पाटील व इतर शिक्षक या सर्वांच्या सदिच्छा व प्रेरणा पाठीशी असल्यानेच हा प्रबंध हाती घेऊन पूर्णत्वापर्यन्त गेला त्याबद्दल या सर्वांचा मी ऋणी आहे.

कॉलेज ऑफ एज्युकेशन, पेठ वडगांव येथील माझे सहकारी प्रा. गोधकर, प्रा. पटेल, प्रा. जगताप, प्रा. बेडेकर, प्रा. अत्तार, प्रा. निर्वाणे, प्रा. म्हात्रे, प्रा. पाटील, प्रा. डोईजड, प्रा. विजापुरे, प्रा. चव्हाण आणि विशेषत: प्रा. कुऱ्हाडे यांनी निरपेक्ष सहकार्य केल्याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. तसेच लिपिक श्री. मुळीक, श्री. निकम, श्री. देशमुख, ग्रंथपाल पाटील डी.डी. व चौत्रे, तसेच सेवक श्री. सुर्यवंशी, श्री. माने, श्री. हिरवे, श्री. दामाडे, श्री. चौगले या सर्वांचे सहकार्य व सहानुभूती मिळाल्याबद्दल त्यांचे आभार.

सदर प्रबंध पुरा करण्याच्या कामात प्रा.सौ. इंगवले यु.एस., प्रा.सौ. सप्रे, प्रा. नाईकनवरे, प्रा. पुजारी, श्री. देवळेकर, पाटील पी.जी. या सर्वांचे सहकार्य लाभले. त्याबद्दल या सर्वांचा मी ऋणी आहे.त्याच बरोबर माझे असंख्य मित्र आणि हितचिंतकांचा मी ऋणी आहे.

माझे चुलते श्री. ह.रा. पाटील, श्री. कृष्णा पाटील, श्री. शंकर पाटील, वरिष्ठ बंधु श्री. बी.एम. पाटील व त्यांच्या पत्नी सौ. छायाताई, कनिष्ठ बंधू एस्.एम्. पाटील व त्यांच्या पत्नी सौ.मायाताई तसेच व्ही.एम. पाटील, आर.एम. पाटील, कु. सुनंदा पाटील, नवनाथ

पाटील व सचित पाटील या सर्वांचे हा प्रबंध पूर्ण करण्यास जी प्रेरणा, सदिच्छा आणि सहकार्य लाभले त्याबद्दल त्यांचा मी सदैव ऋणी आहे. तसेच माझी पत्नी सौ. जयश्री हिने मला माझ्या शोधप्रबंधाच्या प्राथमिक कामात वेळोवेळी जी मदत केली त्याबद्दल मी तिचाही ऋणी आहे.

स्वत: निरक्षर असूनही उच्च शिक्षणाची स्फूर्ती जी माझी माता, श्रीमती आक्काताई महादेव पाटील, हीने दिली त्याबद्दल तिचा मी शतश: ऋणी आहे.

(टी.एम. पाटील)

कोल्हापूर

दिनांक : ९।९।१९९१